सामान्य नागरिकांच्या हक्कासाठी लढा देणारे दैनिक

दैनिक
# सायरन

## थोडक्यात

# लक्ष्मीबाई गणगणे महाविद्यालयात सायबर सुरक्षा कार्यशाळा



« अकोट | प्रतिनिधी »

लक्ष्मीबाई गणगणे कनिष्ट महाविद्यालयात अकोट येथे नुकतीच सायबर सुरक्षे बाबत कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी अकोला येथील शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयातील सुमित संजय सपकाळ, व अनिकेत विजय भुडके या सायबर वॉरियर्स नी ऑनलाईन फसवणूक, वाढता सोशियल मिडीयाचा वापर त्यामधून होणारी फसवणूक, आपण करीत असलेली ऑनलाईन खरेदी,नवनवीन मोबाईल मध्ये येणारे ऐप, फेसबुक अकाउंट हॅक कसे केले जाते, फेक वेबसाईटस कशा ओळखाव्या या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले ही कार्यशाळा क्विक हिल फाऊनडेशन पुणे आणि महाराष्ट सायबर यांच्या सहयोगाने व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश साबु आणि भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. कार्यशाळेचे अध्यक्ष, शाळेचे मुख्याध्यापक काकडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी शिक्षक व शिक्षिका पाटील,पवार, झाडे,मानकर,वानरे,घाटे, चेडे, लोणारे, व सर्व शाळेचे विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.